# स्वच्छ भारत मिशनची निबंध स्पर्धा

30.8.2017 स्वच्छ संकल्प से स्वच्छ सिध्दी अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या वतीने स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत विविध उपक्रम राबविले जात असून, याचाच एक भाग म्हणून निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा 18 वर्षा खालील व 18 वर्षावरील अशा दोन गटात घेतली जाणार आहे. स्वच्छ भारतासाठी मी काय करू शकतो/शकते हा या स्पर्धेचा प्रमुख विषय राहणार असून 250 शब्द मर्यादेत मराठी, हिन्दी किंवा इंग्रजी भाषेत निबंध सादर करता येईल. स्पर्धकापैकी जेष्ठ नागरिक आणि दिव्यांग गटात असणाऱ्या स्पर्धकांचा राष्ट्रीयस्तरावर सन्मानासाठी विशेष विचार केला जाणार आहे. सदर स्पर्धेत जिल्हास्तरावर प्रथम येणाऱ्यास रुपये 15 हजार, द्वितीय रुपये 10 हजार तर तृतीय येणाऱ्यास रुपये 5 हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे. तर राज्यस्तरावर दोन्ही गटातून प्रथम रुपये 51 हजार, द्वितीय रुपये 31 हजार तर तृतीय पुरस्कारास रुपये 11 हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र स्पर्धकांना देण्यात येणार आहे. निबंध हा कल्पक आणि सुस्पष्ट विचार, साधी सरळ मांडणी, नवविचार, विषयाला पोहचविण्यासाठी असणारी, परिणामकारक मांडणी असावी. निबंधातील मजकूर हा स्पर्धकाचा स्वत:चा असावा, इतरांच्या मजकुराचा वापर केलेला आढळल्यास सदर निबंध स्पर्धेतून बाद करण्यात येईल. निबंधातील मजकुर असभ्य, भितीदायक, मानहानीकारक, बदनामीकारक, लिंगभेदावर आधारीत, अश्लील आणि सार्वजनिक उपयोगाकरीता अनुपयुक्त असा नसावा. निबंधातील मजकुर राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि स्थानिक कायद्यांचा भंग करणारा नसावा. तसेच राष्ट्राची मानहानी होईल असा नसावा. निबंध 8 सप्टेंबर 2017 पर्यंत जिल्हा परिषदच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात व कार्यालयी ईमेल nbazpchandrapur@gmail.com सादर करावा. या विषयी अधिक महिती करिता स्वच्छ भारत मिशनचे शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार मनोज डांगरे यांच्या 9404789654 / 9421717333 भ्रमणध्वणी क्रंमाकावर संपर्क करावा. स्पर्धेचे सर्वाधिकार जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकरी यांच्याकडे असतील. तरी स्पर्धेत स्पर्धकांनी मोठया प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद, चंद्रपूर
## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

संकल्प स्वच्छतेचा... स्वच्छ महाराष्ट्राचा...

९ ऑगस्ट ते २ ऑक्टोबर २०१७




पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण

# स्वच्छ संकल्पसे स्वच्छ सिद्धी
# निबंध स्पर्धा

निबंध स्पर्धेसाठी विषय : **स्वच्छ भारतासाठी मी काय करु शकतो/शकते ?**

निबंधासाठी शब्द मर्यादा : **कमाल २५० शब्द**

निबंधासाठी भाषा : **महाराष्ट्रामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत निबंध सादर करता येईल.**

**निबंध स्पर्धेसाठी गट :**

१) १८ वर्षाखालील,

२) १८ वर्षावरील, (स्पर्धकांपैकी ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग गटात असणाऱ्या स्पर्धकांचा राष्ट्रीय स्तरावर सन्मानासाठी विशेष विचार केला जाईल.)

**पारितोषिके :**



**१. जिल्हास्तर दोही गटातून प्रथम –**

प्रथम : रूपये १५ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

द्वितीय : रूपये १० हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

तृतीय : रूपये ५ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

**२. राज्यस्तर दोन्ही गटातून प्रथम –**

प्रथम : रूपये ५१ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

द्वितीय : रूपये ३१ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

तृतीय : रूपये ११ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

**राष्ट्रीयस्तर स्पर्धेत विशेष पुरस्कार व मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गौरव.**

निबंध सादर करण्यासाठी अंतिम दिनांक : दि. ८ सप्टेंबर, २०१७ पर्यंत

निबंध सादर करण्याचे ठिकाण : जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, चंद्रपूर

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक : ९४०४७८९६५४,९४२१७१७३३३

ई–मेल : nbazpchandrapur@gmail.com